जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४२२ दिनांक - ०९/०६/२०२३**

युनिट ५, गुन्हे शाखा पुणे शहर

**पालखीच्या गर्दिचा फायदा घेवुन चोरी करण्याच्या तयारीत असलेल्या दोन इसमांना चोरीचे मोबाईल फोन सह घेतले ताब्यात**

दिनांक १० जून २०२३ रोजी संतश्रेष्ठ जगदगुरु श्री.तुकाराम महाराज व ११ जून रोजी आळंदी येथुन संतश्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराजाचे पालखीचे प्रस्थान होणार आहे.त्या अनुषंगाने पुणे शहर पोलीस दलाने मोठ्या प्रमाणावर बंदोबस्ताची आखणी केलेली आहे.सदरचा पालखी सोहळा हा दिनांक १२ जुन रोजी पुण्यात आगमण होणार असुन १२ व १३ तारखेला पुण्यात मुक्कामी आहे.त्यादृष्टीने मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार व मा.सह पोलीस आयुक्त,श्री.संदिप कर्णिक साहेब यांचे सुचने प्रमाणे मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे व मा.पोलीस उपआयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेची खास पथके तैनात करण्यात आलेली आहेत.पालखी सोहळ्यामध्ये गर्दिचा फायदा घेवुन चैन चोरी व मोबाईल चो-या करणारे चोरटे सक्रिय होत असतात.त्या अनुषंगाने ही पथके कामकाज करतील अशा प्रकारच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

वरील पालखीचे अनुषंगाने युनिट -०५ कडील स्टाफ हडपसर व वानवडी पोलीस स्टेशनचे हद्दीत पालखी मार्गावर गुन्हे प्रतिबंधक गस्त करत असताना पालखीच्या वेळी वारक-यांचे गर्दीचा फायदा घेवुन मोबाईल चोरी करण्याचे इरादयाने शहरात फिरत असलेल्या चोरट्याबाबत खात्रीशीर माहीती मिळाल्यावर गुन्हे शाखेचे पथकाने पुणे सोलापुर रोडवर,हडपसर येथील रविदर्शन चौकाचे पुढे एस.टी. थांब्यावरील इसम नामे १) श्रीकांत राजु जाधव वय २१ वर्षे रा. दर्ग्याजवळ,सर्वोदय कॉलणी,मुंढवा पुणे २) दिलीप बलभिम गायकवाड वय ३३ वर्षे रा.सर्वोदय कॉलणी,मुंढवा पुणे यांना शिताफिने ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेता त्याचेजवळ १,१०,०००/- रु कि.चे एकुण विविध कंपन्याचे ०७ मोबाईल फोन आढळुन आले.त्या मोबाईल फोन विषयी त्यांचेकडे विचारपुस करता त्या दोघांनाही त्याविषयी काही सांगता आले नाही व त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.त्यानंतर त्याचेकडे सखोल तपास करता त्यांनी ते मोबाईल फोन हे हडपसर,मुंढवा,बंडगार्डन,बिबवेवाडी या भागातुन गर्दिचा फायदा घेवुन चोरलेले असल्याचे सांगीतले.आरोपी चोरलेले मोबाईल फोन हे कर्नाटक येथे पाठविण्याचे तयारीत होते.त्याचेकडुन ताब्यात घेतलेल्या मोबाईल फोन बाबत खालील प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे
आढळुन आले आहे.

१. मुंढवा पो.स्टे.गु.र.नं. १८३/२०२३ भा.द.वि.कलम ३७९
२. मुंढवा पो.स्टे.गु.र.नं. १८४/२०२३ भा.द.वि.कलम ३७९
३. मुंढवा पो.स्टे.गु.र.नं. १८२/२०२३ भा.द.वि.कलम ३७९
४. हडपसर पो.स्टे.गु.र.नं. ८५१/२०२३ भा.द.वि.कलम ३७९
५. हडपसर पो.स्टे.गु.र.नं. ८५२/२०२३ भा.द.वि.कलम ३७९
६. बिबवेवाडी पो.स्टे.गु.र.नं. १०७/२०२३ भा.द.वि.कलम ३७९
७. बंडगार्डन पो.स्टे.गु.र.नं. १६७/२०२३ भा.द.वि.कलम ३७९

आरोपीचा पुर्व इतिहास आरोपी श्रीकांत जाधव याचेवर घरफोडी,पाकिटमारी,मोबाईल चोरीचे एकुण २४ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त पुणे शहर रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,पुणे श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,श्री. अमोल झेंडे,मा.सहायक पोलीस आयुक्त, श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-५, चे पोलीस निरीक्षक उल्हास कदम,सहायक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर,पोलीस उप निरीक्षक चैताली गपाट, अविनाश लोहोटे,पोलीस अमंलदार रमेश साबळे,प्रमोद टिळेकर,दया शेगर,शशिकांत नाळे,विनोद शिवले, राहुल ढमढेरे,पांडुरंग कांबळे,पल्लवी मोरे यांनी केलेली आहे.

